आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. पुणे मेट्रोसह राज्यातल्या ११ हजार २४० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने संपन्न.

2. 'स्वच्छता हा स्वभाव' बनायला हवा असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' मधून आग्रही प्रतिपादन.

3. शासकीय औद्योगिक संस्थांमधील तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण देण्यासाठी उद्यापासून 'हर घर दुर्गा' अभियानाला सुरुवात.

4. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज एक दिवसाच्या नागपूर दौऱ्यावर.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी –लोकार्पण

महाराष्ट्रातल्या ११ हजार २४० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. पुण्यातल्या जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मेट्रो सेवेचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते झालं. त्याचबरोबर २ हजार ९५५ कोटी रुपये खर्चाच्या पुणे मेट्रो स्वारगेट- कात्रज विस्ताराची पायाभरणीही त्यांनी केली. पुण्यातल्या भिडेवाडा इथल्या सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेच्या स्मारकाचं भूमिपूजनही मोदी यांनी केलं. तसंच, राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत बिडकीन औद्योगिक क्षेत्राचं लोकार्पण आणि सोलापूर विमानतळाचं उद्घाटन देखील मोदींच्या हस्ते झालं. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. पुण्याचे ट्राफिक कमी करणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. ट्राफिकमुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण येऊन प्रदूषण वाढ कमी करण्यासाठी महायुतीनं पुण्यात मेट्रो आणल्याचं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मनकी बात या मालिकेच्या ११४ व्या भागातून आज देशवासियांशी संवाद साधला. या कार्यक्रमाला१० वर्षे पूर्ण होत असल्याचा भावपूर्ण उल्लेख त्यांनी केला. देशातील प्रतिभावंतांचा उल्लेख करून, तेच आपल उर्जास्थान असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. आकाशवाणी, दूरदर्शनसह इतर इलेक्ट्रोनिक माध्यम, मुद्रित माध्यम आणि सोशल मिडियाचेही आभार मानले. देशाच्या विविध भागात सुरु असलेल्या मुसळधार पावसाचा उल्लेख करून त्यांनी पाणी बचतीच महत्व सांगितलं. झाशीतील जलसखी प्रकल्पाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. मध्य प्रदेशातील दिंडोरी आणि छत्तरपूर इथल्या महिला बचत गटांच्या माध्यमातून जलशक्ती आणि नारीशक्ती एकत्र आल्याचं पंतप्रधान म्हणाले. झाला आणि पुद्दुचेरी इथल्या स्वच्छता मोहिमेचा उल्लेख करून या मोहिमेला १० वर्षे पूर्ण होत असल्याचं ते म्हणाले. स्वच्छ भारत योजनेत सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी सर्वांना केलं. स्वच्छता हा स्वभाव बनला पाहिजे असं आग्रही प्रतिपादन मोदी यांनी 'मन कि बात' मधून केलं. येत्या २ ऑक्टोबरला स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीला ही १० वर्षं पूर्ण होत असल्याचा उल्लेख त्यांनी केला. या अभियानाला लोक चळवळीचं रूप देणाऱ्या प्रत्येकाचे त्यांनी आभार मानले. हे अभियान म्हणजे या उद्देशासाठी आपलं जीवन समर्पित केलेल्या महात्मा गांधीजींना खरी श्रद्धांजली आहे असं ते म्हणाले. अमेरिकेतून परत आलेल्या आणि हजारो वर्षे जुन्या कलाकृतींचा उल्लेख त्यांनी केला. एक पेड मा के नाम या योजनेचा, वनौषधींचा प्रकल्प याचाही उल्लेख त्यांनी केला. विदर्भातील भंडारा जिल्ह्याच्या प्राचीन वस्त्रोद्योगाचा उल्लेख करून भंडाऱ्याच्या ५० पेक्षा जास्त स्वयंसहायता गटाचा आणि टसर सिल्कचा मोदी यांनी आवर्जून उल्लेख केला.

*मैं बात कर रहा हु मेक इन इंडिया की, लोकल प्रोडक्ट को बढ़ावा देने से देश के लोगों को किस तरह से फायदा होता है । इसे एक उदहारण से समझा जा सकता है। महाराष्ट्र के भंडारा जिल्हे में टेक्सटाइल की पुराणी परम्परा है, भंडारा टसर सिल्क हैंडलूम, टसर सिल्क अपने डिज़ाइन, रंग और मजबूती के लिए जानी जाती है । भंडारा के कुछ हिस्सों में पचास से भी अधिक सेल्फ हेल्प ग्रुप इसे संरक्षित करने का काम में जुटे है । इन में महिलाओ की बहुत बड़ी भागीदारी है । यह सिल्क तेजीसे लोकप्रिय हो रही है । और स्थानीय समुदायों को सशक्त बना रही है । और यही तो मेक इन इंडिया की स्पिरिट है ।*

क्रिएट इंडिया या नव्या उपक्रमात युवकांनी रील्स बनविणे, गेमिंग आणि इतर डिजिटल माध्यमांतून सहभागी होण्याचं आवाहन केलं. सोबतच, मेक इन इंडिया, व्होकल फॉर लोकल या उपक्रमांचा उल्लेख करून पंतप्रधान मोदी यांनी आगामी सणांच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

फुले अर्धाकृती शिल्प

नाशिक महापालिकेच्या वतीन मुंबई नाका इथं महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे भव्य शिल्प उभारण्यात आले आहे. त्याचा लोकार्पण सोहळा आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. सुमारे पाच कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेले हे देशातील सर्वात मोठे कांस्याचे अर्धाकृती शिल्प आहे.

मोदी संभाव्य दौरा

संपूर्ण बंजारा समाजाची काशी समजल्या जाणाऱ्या वाशीम जिल्ह्यातील पोहरादेवी इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संभाव्य दौरा दिनांक 5 ऑक्टोबर रोजी नियोजित आहे. या दौऱ्यात संत सेवालाल महाराज तिर्थक्षेत्र आराखडा पोहरादेवी प्रकल्पाच्या ३९७ कोटी ७४ लक्ष तर उमरी आणि पोहरादेवी प्रकल्प आराखड्यातील ३२६ कोटी २४ लाख असे एकूण ७२३ कोटी ९८ लाख रुपयाच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या विविध विकास कामांचं लोकार्पण मोदी यांच्या हस्ते होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाकडून दहा कोटी रुपयांच्या मंडपाची उभारणी केली जात असून यात सहा लाख नागरिकांची बसण्याची व्यवस्था असेल.

राज्यपाल - भंडारा दौरा

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन उद्या १ दिवसाच्या भंडारा दौऱ्यावर येणार आहेत. नियोजित कार्यक्रमानुसार सकाळी ते अभ्यागतांशी संवाद साधणार आहे.

'हर घर दुर्गा' अभियान शुभारंभ

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते उद्या 'हर घर दुर्गा' अभियानाची सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. हा कार्यक्रम मुंबईतील कुर्ला येथील शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये आयोजित करण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित असतील. या अभियानामार्फत राज्यातील शासकीय औद्योगिक संस्थांमधील तरुणींना स्वरक्षणाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये वर्षभर आठवड्यातून 2 ते 3 वेळा तासिका स्वरूपात हे प्रशिक्षण आयोजित केलं जाणार आहे. याव्यतिरिक्त इतर महिला देखील यामध्ये सहभागी होऊ शकतात, असं मंत्री लोढा यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

उद्धव ठाकरे

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आज एक दिवसाच्या नागपूर दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात आज दुपारी नागपूर येथील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली असून, सायंकाळी कळमेश्वर कडील तळयाच्या पाळीवर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळयाचं उदघाटन त्यांच्या हस्ते होणार आहे . त्यानंतर ठाकरे जाहीर सभेला देखील संबोधित करतील.

राज ठाकरेंचा विदर्भ दौरा

दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचा आगामी विधानसभा निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर अमरावती आणि नागपूर विभागाचा दौरा संपन्न झाला. विदर्भातील ११ जिल्ह्याचा दौरा दोन दिवसांत पूर्ण करुन उमेदवारांच्या नावांवर बैठकीत सर्वसाधारण चर्चा करण्यात आल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्त संस्थेनं म्हटलं आहे.

विकास ठाकरे

एका बाजूला नागपूर सुधार प्रन्यास गरीब नागरिकांच्या अनधिकृत प्लॉट्सना गुंठेवारी कायद्यान्वये नियमित करत नाही, आणि दुसऱ्या बाजूला केवळ बिल्डर आणि कॉर्पोरेट कंपन्यांना नियमांचे उल्लंघन करून फायदा देत आहे. नासुप्रने ८० कोटी रुपयांचा लिलाव घोटाळा केला आहे, ज्यामध्ये बिल्डर आणि कॉर्पोरेट कंपन्या सहभागी आहेत. असा आरोप आमदार विकास ठाकरे यांनी केला आहे. नासुप्रने केवळ बिल्डर आणि कॉर्पोरेट कंपन्यांसाठी काम करणे थांबवावे आणि सामान्य नागरिकांना सेवा द्याव्यात, अशी मागणी ठाकरे यांनी नागपूर सुधार प्रन्यासला पत्र लिहून केली आहे. ठाकरे यांच्या पत्रानुसार, "महा विकास आघाडी सरकारने २०२१ ला गुंठेवारी 2.0 योजना सुरू केली होती. ज्याद्वारे ३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या अनधिकृत प्लॉट्सना नियमित करण्यासाठी १ लाखाहून अधिक लोकांनी अर्ज सादर केले आणि नियमितीकरणासाठी ३,००० रुपये भरले. पण केवळ ५,००० पेक्षा कमी प्लॉट्स नियमित झाले. नासुप्र विक्री नोंदणी करार मागत आहे, जो गुंठेवारी कायद्याविरुद्ध आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या विरोधात

आहे. त्याचवेळी, नागपूर सुधार प्रन्यासने एका बिल्डर आणि कॉर्पोरेट कंपनीला फायदा देण्यासाठी स्वतःच्या नियमांसोबत छेडखानी केली, अशी टीका ठाकरे यांनी केली आहे.

नितेश राणे

अमरावती जिल्ह्यातील अतिशय संवेदनशील शहर म्हणून परिचित असलेल्या अचलपूर शहरात मागे झालेल्या गणपती मिरवणुकीवर समाजकंटकांनी केलेल्या दगडफेकीच्या निषेधार्थ शक्ती फाउंडेशनच्या वतीन आज सायंकाळी निषेध मोर्चा आणि धर्मसभेचं आयोजन करण्यात आलं आहे. या सभेला भाजप नेते आमदार नितेश राणे संबोधित करणार आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीन सभेला परवानगी नाकारण्यात आली होती. मात्र आयोजक आणि समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी काढण्यात येणाऱ्या रॅलीचा मार्ग बदलवल्यानंतर कडक बंदोबस्तात सभेला परवानगी देण्यात आल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी दिली आहे.

******